# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

## शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५

## प्रसिध्दीपत्रक (प्रेसनोट)

शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०६/टिएनटि-१, **दिनांक ०२/०५/२०२५** अन्वये उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत सादर करणेबाबत या कार्यालयाच्या दिनांक **१६/०७/२०२५** रोजीच्या प्रसिध्दी निवेदनाद्वारे प्रसिध्दी देण्यात आली होती. सदर परीक्षेस एकूण **२२८८०८** परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परोक्षस एकूण **२११३०८** प्रविष्ठ झाले होते.

त्यापैकी बी.एड. परीक्षेचे **१५७५६** Appear व डी.एल.एड. परीक्षेचे **१३४२** Appear असे एकूण **१७०९८** विदयार्थी/उमेद्वारांनी Appear म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. तरी दि. १४/०८/२०२५ अखेर बी.एड. परीक्षेचे **९९५२** व डी.एल.एड. परीक्षेचे **८२७** असे एकूण **१०७७९** Appear विदयार्थी / उमेद्वारांची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली आहे. अशा विद्यार्थ्यांचा / उमेद्वारांचा निकाल प्रसिध्द करण्यात येईल.

तथापि ज्या विदयार्थी/उमेद्वारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयास अद्यापपर्यंत सादर केलेले नाही अशा उर्वरित बी.एड. परीक्षेचे **५८०४** व डी.एल.एड. परीक्षेचे **५१५** अशा एकूण **६३१९** Appear विद्यार्थ्यांचा/उमेद्वारांचा निकाल राखीव ठेवण्यात येईल.

तरी ज्या विद्यार्थ्यांनी/उमेद्वारांनी अद्यापपर्यंत https://www.mscepune.in/dtedola/TAIT2025InfoAppear.aspx या लिंकमध्ये माहिती विहित मुदतीत सादर केली नाही अशा विदयार्थी/उमेद्वारांनी दिलेल्या लिंकद्वारे विहित मुदतीत माहिती सादर न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विदयार्थी/उमेद्वारांची राहिल तद्नंतर याबाबत आलेल्या कोणत्याही प्रकारच्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची सर्व विदयार्थी/उमेद्वारांनी नोंद घ्यावी.

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५ चा निकाल सोमवार दि.१८/०८/२०२५ रोजी** प्रसिध्द करण्यात येणार आहे.

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** १७/०८/२०२५

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४